## नक्षत्र शिरोमणी

खालील अभ्यासकांनी आमच्या संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या 'नक्षत्र शिरोमणी' ह्या पदवी परीक्षेत उत्तम यश मिळवून पदवी प्राप्त केली आहे. सर्वांचे अभिनंदन !

१. श्री. सुधाकर आपटे, पेण
२. श्री. नरेश चंपावेरीया, मुंबई
३. सौ. रेखा पंडीत
४. श्री. हरीभाऊ जोशी, पंढरपूर
५. श्री. दिनकर पाटील, जळगांव
६. डॉ. आशिष हंकारे, कुपवाड
७. श्री. विजय इंगळे, औरंगाबाद
८. श्री. चंद्रकांत जोशी, औरंगाबाद
९. सौ. वंदना पुराणिक, औरंगाबाद
१०. श्री. गणपत भाटकर, मुंबई
११. श्री. कमलाकर महाजन
१२. श्री. बी. के. कुळकर्णी, बदलापूर
१३. श्री. एस. आर. पाटील, पुणे
१४. श्री. वासुदेव पांडे, चंद्रपूर
१५. सौ. शांती पाटकर, कुडाळ
१६. श्री. सुभाष एकतारे, ठाणे
१७. श्री. गणेश जोशी, चौका
१८. श्री. सुहास जोशी, औरंगाबाद
१९. श्री. देविदास महाजन, औरंगाबाद
२०. श्री. गोपाळ कुळकर्णी, औरंगाबाद
२१. सौ. वैशाली गोलंदे, औरंगाबाद
२२. सौ. वर्षा भिलेगांवकर, औरंगाबाद
२३. सौ. अनिता कलंत्री, औरंगाबाद
२४. सौ. प्रेरणा जंगम, औरंगाबाद
२५. श्री. अक्षर अन्सारी, औरंगाबाद
२६. श्री. पद्माकर जहागिरदार, जालना
२७. सौ. उमा मराठे, हुबळी
२८. सौ. अनिता गवंडी, औरंगाबाद
२९. श्री. अरविंद भट, ठाणे
३०. श्री. श्रीकांत सूत्रे, बार्शी
३१. सौ. गौरी पाटील
३२. श्री. विलास घाटगे, कोल्हापूर
३३. श्री. उज्ज्वल पावते, औरंगाबाद
३४. सौ. सुनिता इंगळे
३५. सौ. स्मिता आबड
३६. सौ. स्मिता पित्ती
३७. सौ. संतोषी बोरा
३८. सौ. श्रद्धा मुंदडा
३९. सौ. प्रतिभा उपाध्याये
४०. सौ. नेहा मोहता
४१. श्री. सुभाष नाईक, गोवा
४२. श्री. नंदकिशोर उमराणी, पुणे
४३. सौ. अर्चना लोंढे, पुणे
४४. कु. अर्चना सामंत, मुंबई
४५. श्री. शाम सदलगेकर, बेळगांव
४६. सौ. ज्योती राठोड, जालना
४७. श्री. अतुल कुळकर्णी
४८. श्री. मयुरेश रिसबूड
४९. श्री. अेम. अेस. हिरेमठ, कोल्हापूर
५०. श्री. प्र. य. गडकरी, कल्याण
५१. श्री. प्र. ल. जोशी, कल्याण
५२. श्री. अजय पांडव, औरंगाबाद
५३. अश्विनी पंडीत, औरंगाबाद
५४. श्री. नंदकिशोर मुळे, औरंगाबाद
५५. सौ. जयश्री काळे, औरंगाबाद
५६. श्री. दिलीप भालेराव, औरंगाबाद
५७. डॉ. रमेश परोपकारी, औरंगाबाद
५८. सौ. कांचन दिग्रसकर, औरंगाबाद
५९. सौ. मंगला दिवेकर, मुंबई
६०. श्री. सत्यनारायण कंकर, नांदेड
६१. श्री. वसंत जोशी, औंध
६२. श्री. लक्ष्मीकांत ढगे, नांदेड
६३. श्री. ना. धो. पोलादवार, नांदेड
६४. श्री. आशुतोष महाशब्दे, डोंबिवली
६५. श्री. राजेन्द्र क्षत्रिय, संगमनेर
६६. सौ.मधुरा रोध, कल्याण
६७. श्री. विनय पंचनाध, अहमदनगर
६८. श्री. लक्ष्मण कामठे, पुणे
६९. श्री. नरेन्द्र जोशी, ठाणे
७०. श्री. मधुकांत कांबळे, औरंगाबाद
७१. डॉ. अंजना परोपकारी, औरंगाबाद
७२. सौ छाया देशमुख
७३. डॉ. विश्वास बल्लाळ, औरंगाबाद
७४. श्री. विकास जोशी, औरंगाबाद
७५. श्री. वैभव कांबळे, औरंगाबाद
७६. श्री. प्रितम पाडळे, उंब्रज

'नक्षत्र शिरोमणी' पदवी घेतलेले बरेचजण आपल्या अंकाचे वर्गणीदार झालेले आढळत नाहीत. तरी कृपया त्यांनी वर्गणीदार होऊन सहकार्य करावे. – संपादक





# अयनांश

**श्री. सुभाष एकतारे**
४०९०, क्रँडाल सर्कल, सांटा क्लारा, कॅलिफोर्निया, यु.एस.ए. subhash_ektare@yahoo.com

कोणत्याही हिंदू किंवा भारतीय ज्योतिष–शास्त्राचा अभ्यास करताना ग्रह, राशी, नक्षत्र, लग्न वगैरे शब्दांच्या परिभाषा माहित असणे जसे आवश्यक असते तसेच अयनांश म्हणजे काय ते माहित असणे तितकेच जरुरीचे आहे. माझ्या अभ्यासाच्या सुरुवातीच्या काळात मला अयनांश म्हणजे नक्की काय ? ते केव्हा वजा करायचे व केव्हा मिळवायचे ? आणि का ? असे बरेच प्रश्न भेडसावीत असत. त्यातच भर म्हणजे लाहिरी, रामन, कृष्णमूर्ती, फागन यांनी वेगवेगळे अयनांश वापरात आणले. तेव्हा ह्या विषयांचा मुळापर्यंत शोध घेऊन त्याची माहिती ज्योतिष बांधवांना द्यावी हा उद्देश.

आपण जेव्हा जन्मवेळेची कुंडली जेव्हा मांडतो तेव्हा त्या कुंडलीत जन्मवेळचे लग्न व इतर ग्रह लिहितो. अशा ग्रहांचे अंशात्मक अंतराचे मोजमाप एका निश्चित बिंदूपासून करायला हवे. जसे एखादा ठळक तारा. पण आकाशात असे बरेच तारे आढळतात. त्यातून कोणता निवडायचा हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून राहील. वेदिक ज्योतिषशास्त्रात फार पुरातन काळापासून मेष राश्यारंभापासूनचे अंतर ग्राह्य धरले आहे आणि पाश्चिमात्य ज्योतिषी मात्र हेच अंतर वसंत संपात–बिंदू मोजत असत. इसवीसनाच्या सुरुवातीला या दोन्ही बिंदूंमध्ये फारसा फरक नव्हता. परंतु इ.स. च्या दुसऱ्या शतकात हिप्पारकस नावाच्या शास्त्रज्ञाला असे आढळून आले की हा वसंत संपात बिंदू अचल ताऱ्यांपासून पश्चिमेला हळूहळू मागे सरकत आहे. याचाच अर्थ मेष राश्यारंभ व वसंत संपातबिंदू यातील अंतर वाढत चालले आहे. यालाच संपातबिंदूचे precession म्हणतात.

आकाशात दिसणाऱ्या १२ मुख्य तारकापुंजा–नुसार खगोलाची विभागणी बारा समान राशींमध्ये केली गेली. वस्तुत: या बारा राशींच्या तारका–पुंजांची व्याप्ती सारखी नाही. थोडीफार कमी जास्त आहे. खालील चित्रावरून त्याची योग्य कल्पना येईल.

या चित्रावरून आपल्या असे लक्षात येईल की, मेष राशीचा आरंभ हा आकाशातील एक काल्पनिक बिंदू आहे. वसंत संपात बिंदूसारखा तो निश्चित ठरविता येण्यासारखा नाही. त्यामुळे सर्व खगोलशास्त्रज्ञ आणि बहुतेक पाश्चिमात्य ज्योतिषी ह्या बिंदूचा म्हणजेच Vernal Equinox चा अंतर मोजण्यासाठी वापर करतात. येथून सुरु होणाऱ्या zodiac ला सायन (Tropical zodiac) असे म्हणतात. मेष राश्यारंभापासून सुरू होणाऱ्याला निरयन (siderial zodiac) असे संबोधतात. या सायन व निरयन मधील अंशात्मक फरकाला अयनांश असे म्हणतात.

हिप्पारकसचा समकालीन Claudius Ptolemy (approx. 85-165CE) याने रोमन साम्राज्यात प्रथमच ज्योतिष व खगोलशास्त्राचा वेगळेपणा शब्दांकित केला. त्या सुमारास वसंत–संपात बिंदू हा देखील मेष आणि मीन राशीच्या संधीजवळ होता. थोडक्यात दोन्ही zodiac ची सुरुवात जवळपास एकच होती. त्यामुळे त्या काळातले ज्योतिषी आणि खगोलशास्त्रज्ञ वसंतसंपात बिंदूलाच मेषारंभ मानत असत. असे




असले तरी भारतीय हिंदू ज्योतिषी अचल ताऱ्यांवर आधारित सायडेरियल झोडियॅक (निरयन) वापरीत असत व अरेबियन आणि पाश्चिमात्य ज्योतिषी संपात बिंदूवर आधारित ट्रॉपिकल झोडियॅक (सायन) वापरीत असत.

इथपर्यंत समजले. ठीक आहे. पण ह्या वसंत संपात बिंदूच्या उलट चालीचे कारण काय ? हा प्रश्न अनुत्तरीत राहिला. आपण त्याचा विचार करू. त्यासाठी प्रथम वसंत संपात बिंदू हे काय प्रकरण आहे ते समजावून घेऊ. सगळ्यांना माहीत आहे की पृथ्वी सूर्याभोवती प्रदक्षिणा करते. परंतु पृथ्वीवरून पाहणाऱ्याला असे वाटते की सूर्य आपल्याभोवती एका लंब वर्तुळाकार कक्षेत फिरतो आहे. ही सूर्याची कक्षा आणि अंतरिक्षातील विषुववृत्त हे एकमेकांस दोन बिंदूत छेदतात. या छेदनबिंदूतून जाताना सूर्य जेव्हा विषुववृत्ताच्या दक्षिणेकडून उत्तरेकडे जातो त्या छेदनबिंदूला वसंतसंपात बिंदू म्हणतात. कारण त्यावेळेला उत्तर गोलार्धात वसंत ऋतु सुरु होतो. आता पृथ्वी जशी सूर्याभोवती प्रदक्षिणा करते तशीच ती स्वत:च्या आसाभोवतीही फिरत असते. भवऱ्यासारखी. तेव्हा भवरा जसा गुंगतो तशी पृथ्वीदेखील गुंगते. थोडक्यात दोन्ही ध्रुव एका वर्तुळाकार कक्षेत फिरतात. स्वाभाविक पृथ्वीचा आसदेखील थोडा बदलतो, स्थिर रहात नाही व परिणामी विषुववृत्ताची पातळी आपला कोन बदलते. या पातळीचा कोन बदलला की स्वाभाविक छेदनबिंदू देखील बदलतील. तसा हा सध्याचा वसंतसंपातबिंदू दरवर्षी थोडा पश्चिमेस (म्हणजेच मागे) सरकतो.

उजवीकडील चित्रात पृथ्वीचा आस भवऱ्या-सारखा कसा गुंगतो ते दाखविले आहे. डावीकडील चित्रात अंतरिक्षातील उत्तर ध्रुव ज्या वर्तुळाकार कक्षेत फिरतो ते दाखवले आहे. सध्या हा उत्तर ध्रुव पोलॅरीस या ताऱ्याजवळ आहे. अंदाजे ४००० वर्षांपूर्वी तो थुबन या ताऱ्याजवळ होता व अजून १२,००० वर्षानंतर तो Lyra या तारकापुंजातील










Vega या ताऱ्याजवळ असेल. अशा तऱ्हेने हा ध्रुव २५,७८६ वर्षात एक पूर्ण प्रदक्षिणा करतो.

ट्रॉपिकल झोडियॅकमध्ये वसंतसंपात बिंदू-पासून सुरुवात धरल्यामुळे कोणत्याही प्रकारचा वादविवाद नाही. कारण हा बिंदू गणिताने निश्चित काढता येतो. याउलट निरयन पद्धतीमध्ये मेष राशीच्या सुरुवातीबद्दलच बरेच वादविवाद आहेत. तेव्हा अशा प्रत्येक बिंदूचे वसंतसंपात बिंदूपासूनच अंशात्मक अंतर म्हणजेच अयनांश वेगवेगळे असणार. म्हणूनच आजमितीला लाहिरी, रामन किंवा कृष्णमूर्ती असे वेगवेगळे अयनांश भारतात वापरात आहेत. परंतु संपूर्ण भारतात एकसूत्रता असावी या उद्देशाने भारत सरकारने एन. सी. लाहिरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने चित्रा म्हणजेच Spica, the Ear of Wheat, Alpha Virginis हा तारा शून्य अंश तूळेत धरून त्याच्या विरुद्ध मेष राशीचा आरंभ धरून जे अयनांश निश्चित केले ते लाहिरी अयनांश म्हणून मान्यता पावले. इ.स. २८५ मध्ये वसंत संपात बिंदू हाच मेष शून्य बिंदूवर होता. (म्हणजेच त्या वर्षी अयनांश शून्य होते.) भारतातील बहुतेक ज्योतिषी हेच अयनांश वापरतात.

निरयन पद्धती वापरणारे पाश्चिमात्य ज्योतिषी मात्र फागन-ब्रॅडले अयनांश वापरतात. ते चित्रा तारा २९ अंश कन्येत धरून काढलेले अयनांश आहेत. फागनच्या मते हे अयनांश पूर्वीच्या बॉबिलोनियन गणिताशी मिळतेजुळते आहेत.

स्वीस एफिमेरीजच्या वेबसाइटवर तर जवळपास १२ वेगवेगळे अयनांश निवडण्याची सोय आहे. प्रोफेसर के. एस. कृष्णमूर्ती यांनी कृष्णमूर्ती अयनांश वापरात आणले. त्यासाठी त्यांनी मेष राश्यारंभासाठी कोणता तारा निवडला याचा त्यांच्या लिखाणात कोठेही उल्लेख नाही. परंतु न्युकोंबने दिलेला संपातबिंदूंचा वेग जो ५०.२३८८४७५ सेकंद (विकला) दरवर्षी असा आहे तोच वापरून त्याप्रमाणे येणारे वर्ष इ.स.

२९१ हे शून्य अयनांशाचे वर्ष मानले आहे. हे वर्ष लाहिरींनी मानलेल्या इ.स. २८५च्या अगदी जवळ आहे. त्यामुळे लाहिरी व कृष्णमूर्ती अयनांशात ६/७ कलांचाच फरक आहे. सध्या २००३ च्या के.पी. इयरबुकमध्ये दिलेल्या समीकरणाप्रमाणे आलेले नवीन के.पी. अयनांश बहुतांश के.पी. ज्योतिषी तसेच सॉफ्टवेअरमध्ये वापरतात. नवीन के.पी. अयनांशांचा के.पी. अँड ॲस्ट्रॉलॉजी इयरबुक २००३ मध्ये प्रो. के. बालचंद्रन यांनी दिलेला फॉर्म्युला.

NKPA = B + [TP + (T*T*A)]/3600

Where

B = 22 + 1350/3600 =

22-22-30 @ 15 Apr. 1900

P = 50.2388475

A = 0.000111 Sec per year

T = Year in decimal - 1900

वरील नवीन के.पी. अयनांशाशिवाय (१) जुने के.पी. अयनांश व (२) के.पी. लिनीअर अयनांश असे आणखी दोन अयनांश प्रचारात आहेत. श्री. ए. आर. रायचूर हा जुन्या व जाणकार के.पी. ज्योतिषाच्या मते या अयनांशातील फरक इतका मामुली आहे की, ज्यामुळे एकाद दुसरी बॉर्डर लाइन केस सोडल्यास, बहुतेक कोणत्याही सबमध्ये फरक पडत नाही. त्यामुळे नवीन अभ्यासकांनी त्याबाबतीत गोंधळून जाण्याचे मुळीच कारण नाही.


## अभिनव योजना

'नक्षत्राचं देणं' ची ५ वर्षांची वर्गणी रुपये ६००/- भरा

आणि

दोन जन्मकुंडल्या / किंवा दोन प्रश्नकुंडल्यांवरून

प्रत्येकी एक-एक प्रश्नाचे उत्तर आमच्याकडून मोफत मिळवा.

ही सवलत वर्गणी भरल्यापासून एक वर्षभर उपलब्ध राहील.

ह्या अभिनव योजनेचा फायदा घ्या :

ही योजना फक्त नवीन वर्गणीदार होणाऱ्यांसाठीच आहे.

संपर्क :

श्री. सुनील गोंधळेकर

१०९, गोदावरी, लक्ष्मी इंड. कॉम्प्लेक्स,

वर्तकनगर, ठाणे-४०० ६०६.

फोन : २५८८८१७९ / २५८८२९२० (घर)






# अगत्यार जीव नाडी


**विंग कमांडर शशिकांत ओक**

ए-४/४०४, गंगा हेमलेट सोसायटी, विमाननगर, पुणे-४११ ०१४. मोबाईल : ०९८८१९०१०४९


तामिळनाडू राज्याची राजधानी आहे चेन्नई उर्फ मद्रास. तमिळ संस्कृतीची देखील ती राजधानी आहे असे म्हटले तर फार अतिशयोक्ती होणार नाही. त्याठिकाणी वडपळणी उपनगर आहे. पूर्वी फार लोकप्रिय, बालपणातील आठवणींचे 'चांदोबा' हे मुलांचे मासिकाचे प्रकाशन, याच भागातील कार्यालयातून अनेक वर्षांपासून होत असे. तो प्रभाग नाडी भविष्यासाठीही असाच लोकप्रिय आहे.

पूर्वी ओम उलगनाथन त्यांच्या ईरटै जीवनाडीचे अद्भूत वाचन या भागातील एका मंदिरापाशी करत असत. त्याचे अनुभव, पत्ता माझ्या हिंदी पुस्तकात आहेत. आता सध्या अगत्यार किंवा (अगस्त्य) जीव नाडीचे वाचन श्री. हनुमत दासन या भागातील करत असतात. त्यांच्या जीव नाडीवाचनात आलेले काही अनुभव, किस्से, दिनतंती नावाच्या तमिळ साप्ताहिकातून वेळोवेळी प्रसिद्ध होत असतात. त्याचे स्वैर भाषांतर श्री. विश्वनाथ गोपी करतात. मराठी वाचकांना त्यातील काही अनुभवांची ओळख करून देणे हा या लेखाचा उद्देश आहे. त्या अनुरोधाने नाडी ग्रंथ भविष्याची सामान्य ओळख करून देऊन नाडी लेखनकर्त्या महर्षींचा भविष्य लेखनामागील उद्देश स्पष्ट करण्याचे कार्यही घडेल.

नाडी ग्रंथ भविष्य ही संज्ञा आता मराठी लोकांना गेल्या १०-१५ वर्षांच्या काळात थोडीफार परिचित झालेली आहे. दक्षिण भारतात तमिळ भाषेत ताडपत्रावर कूट लिपितून कोरलेले भविष्य आता महाराष्ट्रातील अनेक शहरांत पहायला उपलब्ध आहे. रामायण, महाभारत, भागवत या धार्मिक ग्रंथांतून सामान्यपणे उल्लेखलेल्या अनेक महर्षींच्या नावाने या नाडी ग्रंथ भविष्य ताडपट्ट्या उपलब्ध आहेत. त्यापैकी अगस्त्य, महाशिव, कौशिक म्हणजेच विश्वामित्र, वसिष्ठ, शुक, भृगु, काक भुजंदर (भुसुंडी) आदि महर्षींची नावे असलेल्या नाड्या सध्या जास्त प्रचलित आहेत.

ज्यांना नाडी ग्रंथ भविष्याची काहीच माहिती नाही त्यांच्या सोयीसाठी थोडक्यात असे सांगता येईल की या महर्षींनी आपल्या प्राज्ञचक्षूंच्या सामर्थ्यावर अनेकांचे जीवनपट पाहिले. आपल्या निर्देशनाखाली शिष्यगणांकडून त्याची काटेकोरपणे नोंद केली व अनंत काळपर्यंत मानवाला उपयोगी पडणाऱ्या नाडी ग्रंथ भविष्याची निर्मिती केली.

नाडी ग्रंथ भविष्य पहाण्यासाठी पुरुषांना उजव्या व स्त्रियांना डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा, त्यावरील सर्व रेषा ठळक व व्यवस्थित दिसतील अशा बेताने उमटवून द्यावा लागतो. त्या रेषांच्या ठेवणीवरून महर्षींनी १०८ विभाग पाडलेले आहेत. नाडीकेंद्रात त्यापैकी उपलब्ध पट्ट्यांशी त्या ठशांना पडताळून त्यांच्याशी जुळणाऱ्या पट्ट्यांचे पॅकेट आणले जाते. नंतर त्यातील एकएक पट्टीतील थोडा थोडा मजकूर वाचून तो जातकाच्या माहितीशी जुळतो का, ते पाहिले जाते. बऱ्याच न जुळणाऱ्या पट्ट्या बाद करून शेवटी एक अशी पट्टी येते की त्यातील सर्व माहिती जातकाशी तंतोतंत जुळते. उदाहरणार्थ स्वत: नाव, आई-वडीलांचे, पती-पत्नीचे,